:: प्रकरण - पहिले ::

# * अभ्यास विषयाची ओळख *

## १.१] * विषय प्रवेश :-

शिक्षक प्रशिक्षणाचे स्वरूप आज जे दिसते आहे त्याच्या पाठीमागे अनेक वर्षांच्या मतमतांतराचा झगडा व शास्त्रज्ञांच्या परिश्रमाचे पर्वत उभे आहेत. शिक्षण व्यवस्थेत शिक्षकाला व शिक्षक - प्रशिक्षणाला अतिशय महत्वाचे स्थान आहे. शिक्षकांचे प्रशिक्षण हे राष्ट्राच्या जडणघडणीसाठी, देशाची उन्नतीसाठी, राष्ट्रीय एकात्मता वाढीस लावण्यासाठी, सुजान जागरूक नागरिक निर्माण करण्यासाठी अतिशय महत्वाचे आहे. विशेषत: प्राथमिक शिक्षकांसाठी प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थींना जर उच्च शिक्षण दिले की ज्यातून राष्ट्रीय एकात्मता, सुजान नागरिक निर्माण होतील. असे शिक्षण प्रशिक्षणार्थींना दिले गेले तर निश्चितपणे त्यांच्याकडून शिक्षण घेणारे विद्यार्थी हे ध्येयवादी, सुजान नागरिक निर्माण होतील. कारण एका शिक्षकाला चांगले. दर्जेदार प्रशिक्षण मिळाले तर तो आपल्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देईल.

आज आपल्या भारत सरकारने प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तिचे केले आहे त्यामध्ये सरकारने वयोमर्यादा चौदा वर्षां पर्यंन्त

मोफत आणि सक्तिचे शिक्षण केले आहे. हेतू हा की किमान प्राथमिक शिक्षण हे देशातील प्रत्येक नागरिकाला घेता यावे. भारतीय राज्यघटनेने इ.स. १९५० साली मानवी मुलभुत हक्कांपैकी "शिक्षण घेणे" हा एक हक्क मान्य केला आहे. भारत देश हा विकसनशील देश आहे. जर आपल्या देशाची, राष्ट्राची औद्योगिक, सामाजिक, सांस्कृतिक राजकीय इत्यादी क्षेत्रात प्रगती करावयाची असेल तर शिक्षकांचे प्रशिक्षण हे चांगल्या दर्जाचे शिक्षक कसे निर्माण होतील असे पाहिजे. एकूण प्रत्येक शिक्षक प्रशिक्षणार्थींना गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण मिळाले पाहिजे ज्यातून गुणवत्तापूर्ण शिक्षक निर्माण होतील. देशाचे भावी आधारस्तंभांना वळण लावणाऱ्या शिक्षकांना जर गुणवत्तापूर्ण, प्रशिक्षण मिळाले तरच त्याच्याकडून तयार होणारी नविन पिढी ही निश्चितपणे आपल्या देशाला प्रगती पथावर नेल्याशिवाय राहणार नाही. शिक्षक हा सर्व शिक्षण प्रक्रियेचा कैंद्रबिंदु असून तो पाठीच्या कण्याप्रमाणे महत्वाचा आहे.

## १.२] ** <u>विषयाचे महत्व</u> :-

कुंभार मातीला आकार देवून आपणास पाहिजे असे मडके बनवितो त्याप्रमाणे शिक्षक आपल्या संस्काराने, आचरणाने देशाचे भावी नागरिक सुजाण बनविण्यासाठी मुलांना शिक्षण देत असतात. आपल्याकडे एक म्हण प्रचलीत आहे, खाण तसी माती यानुसार शिक्षकच ज्ञानी, सदाचारणी, सर्वगुणसंपन्न नसेल तर त्याच्या शाळेमधून बाहेर पडणारा विद्यार्थी हा काहीही न शिकता कोरडाच बाहेर पडेल. असे म्हटले जाते की एक डॉक्टर चुकला तर एखादी व्यक्ती दगावेल परंतु जर एक शिक्षक चुकीचे शिकवत राहिला तर त्याच्याकडून शिक्षण

होणारी पिढीच दिशाहीन होईल. शिक्षण हा मानवाचा तिसरा डोळा आहे. म्हणून जर डोळा सदोष असेल तर त्यातून मिळणारे ज्ञान हे सुध्दा सदोष असेल.

पदविका अभ्यासक्रम हा प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या मुलांना समोर ठेवून आखण्यात आलेला आहे. मुलांना वळण लावण्याचे काम हे प्रथम घरातील वातावरणावर अवलंबून आहे परंतु त्यांच्या अभिरुचीला प्रोत्साहन देण्याचे काम हे प्राथमिक शिक्षणातूनच सुरु होते. म्हणून ही मुले घडविणारे शिक्षक हे जर उत्तम असतील तरच त्यांच्या हातून जाणारे देशाचे भावी नागरिक ज्ञानी, सुजाण, सुसंस्कृत असतील म्हणून पदविका प्रशिक्षणाला अतिशय महत्वाचे स्थान आहे.

शिक्षकाला प्रामाणिकपणे आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी प्रशिक्षणाची आवश्यकता आहे त्याच प्रमाणे शिक्षकांचा पेशा पत्करणाऱ्या प्रत्येक व्यक्तिला प्रशिक्षण घेणे जरुरी आहे. शिक्षकांच्या प्रशिक्षणाची माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी शिक्षक प्रशिक्षणामध्ये वेळोवेळी झालेले बदल, सुधारणा लक्षात घेवून समाज, राष्ट्र यांच्या उन्नतीसाठी शिक्षक प्रशिक्षणात अत्यावश्यक बदल केले जावेत अशी अपेक्षा आहे. शिक्षण ही आता व्यक्तिगत बाब राहीली नसून, ती राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाब झाली आहे. शिक्षण हे सामाजिक शास्त्र आहे. समाजाच्या गरजांचे आशा-आकांक्षांचे प्रतिबिंब त्यामध्ये पडलेले असते. समाजात जसजशी स्थित्यंतरे होत जातात तसतशी स्थित्यंतरे शिक्षणातही होतात.

पाया भक्कम असेल तर इमारत भक्कम होईल. म्हणून प्राथमिक शिक्षणासाठी लागणाऱ्या शिक्षकांच्या प्रशिक्षणावर लक्ष केंद्रित करुन विचार केला तर, आपणास असे दिसून येते की, देशाची भावी

पिढी ही प्राथमिक शिक्षणाच्या पायरीतून पुढे ती काय होऊ शकेल हे त्यांना मिळणाऱ्या शिक्षणावर अवलंबून आहे. म्हणून शिक्षणाचा पाया हा प्राथमिक शिक्षण आहे. यासाठी या पाया भरणाऱ्या शिक्षकांचे प्रशिक्षण हे देशाच्या, समाजाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे आहे.

## १.३ ** शिक्षक प्रशिक्षण ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

प्राचिन भारतीय शिक्षणाची परंपरा उज्वल आहे. आर्यांचे वैदिक वाङ्मय, आर्यांची महाकाव्ये, पुराणे, शिक्षणाचे धर्मनिष्ठ ध्येय, गुरुकुल पध्दती, शील संवर्धन, व्यक्तिविकास, समाजत्राण, व्यावसायिक निती, वैयक्तिक लक्ष वगैरे विशेष स्थाने सांगता येईल. ही परंपरा टिकविण्याचे कार्य पाठशाळा, आश्रम, विहार, मठ, मक्तब इत्यादी संस्थात होत असत . उदा. तक्षशिला, नालंदा, काशीकांची ही केंद्रे भारतीय शिक्षण प्रसार करीत मुस्लिम राजवटीत धार्मिक शिक्षणावर भार असे प्राचीन भारतात वेळोवेळी वेगवेगळ्या शिक्षणपध्दती अस्तित्वात आल्या.

### ** प्राचीन भारतीय शिक्षण - पध्दती **

शिक्षण व्यवस्थेचा विकास वैदिक काळापासून भारतीयांनी ज्ञानाचे महत्त्व वर्णिले आहे त्यातही मनुष्याच्या मनाचा विकास हे साध्य मानले गेले. ज्ञान साध्य करावयाचे असल्यास, ऐहिक जीवना-पासून दूर अरण्यात राहून ज्ञानसाधना करावयाची असते. या विचारातून गुरुकूल, आश्रम, विहार व मंदिरे ही विद्येची केंद्र बनली. गुरुगृही राहावयास गेलेल्या विद्यार्थ्यांचे गुरुशी संबंध सहजिकच मुलासारखे असत. उपनयन संस्कार अतिशय प्राचीन असून विद्यारंभाचे

ते प्रतीक मानले गेलेले वेद हा अध्ययनाचा मुख्य विषय असे. व शिक्षणामध्ये, पाठांतर प्रमुख मानले जाई. आरंभापासूनच वादविवाद हे ज्ञानोपासनेचे साधन मानले गेले. ब्रम्हचारी या शब्दातूनच तत्कालीन शिक्षणाचे विषय व शिष्याचे आचरण यांचा बोध होतो. अनेकदा पितासुध्दा घरात मुलाला शिकवित असे. लेखनकला अस्तित्वात होती किंवा नाही हा जरी विवादास्पद मुद्दा असला तरी शिक्षणाच्या प्रक्रियेत बरीच शतके लेखनाचा अंतर्भाव झालेला नव्हता. वैदिक वाङ्‌मयाच्या विकासाबरोबरच ज्ञानाच्या क्षेत्रात विस्तार होऊ लागला. यज्ञशास्त्र उदयास आले. आश्रम पध्दतीच्या शिक्षणाचा विस्तार होऊ लागला. वैदिक वाङ्‌मयात स्त्री शिक्षणाचे उल्लेखही येतात. स्त्रियांना नृत्य व गायन शिकविले जाई, ब्राम्हण ग्रंथामध्ये गणित, छंदशास्त्र व व्याकरण यांचा अभ्यास विषयात समावेश आहे. या काळात राज्यकर्ते लोक शिक्षणात हस्तक्षेप करीत नसत. उलट शिक्षणाच्या बाबतीत उदार धोरण असे.

उपनिषदांच्या काळात समाजाच्या सर्व थरातील लोक तत्वज्ञानाचा अभ्यास करीत तैत्तिरीय उपनिषदात शिक्षण पूर्ण झाल्यावर गुरु शिष्याला उपदेश करतो त्यावरुन शिक्षण विषयक आदर्शाची कल्पना येते. सत्य, धर्म, स्वाध्याय, इत्यादींना दिलेले महत्व सूचक आहे. मैत्रेयीगार्गी यासारख्या स्त्रिया तत्वज्ञानात निष्णात होत्या अभ्यासक्रमामध्ये वेदांगे, इतिहास, पुराण ब्रम्हविद्या, गणित, नीतिशास्त्र, खगोलशास्त्र, शस्त्रविद्या, तर्कशास्त्र या सारख्या अनेक नव्या विषयांची भर पडली.

सूत्रवाङ्‌मयामध्ये विद्यार्थी - जीवनाविषयी विस्तृत विवेचन आढळते. त्यावरुन तत्कालीन आदर्शाची कल्पना येते. शिष्याने

गुरूगृही कसे रहावे, माता - पित्याशी कसे वर्तन करावे, व स्वाध्याय कसा करावा या विषयी नियम आहेत. शिक्षण पूर्ण झाल्यावर शिष्य स्नातक बने. पुढेही जन्मभर स्वाध्याय चालू ठेवावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

स्मृतीमध्ये केवळ धनप्राप्तीच्या हेतूने गुरूने शिष्याला शिकवू नये, असा विचार व्यक्त झाला आहे. कौटिल्या अध्यापनाचा पध्दतीतील शुश्रूषा, श्रवण, ग्रहण, धारणा, ऊहापोह, विज्ञान व तत्वाभिनिवेश अशा सात पायऱ्या सांगितल्या आहेत. अनुभवातून मिळणाऱ्या शिक्षणाचाही कौटिल्याने उल्लेख केला आहे. या काळात लेखनकला, मोठ्या प्रमाणात उदयास आली. तरी देखील मौखिल पध्दतीनेच शिक्षण दिले जाई. अभ्यासाचे क्षेत्र आणखी विस्तारले. महाभारतात नैमिष, कण्व भारद्वाज इत्यादी आचार्यांच्या आश्रमांचे वर्णन आढळते हे आश्रम म्हणजे लहान विद्यापीठेच होती. बौध्द विहारांचे विद्यापीठात स्थांतर व्हावयास आरंभ याच काळात झाला. हिंदू मंदिरामध्येही शिक्षणकेंद्रे निर्माण झाली. गुप्तकाळापासून विद्यापिठे समृध्द बनली व परदेशातूनही विद्यार्थी भारताकडे येऊ लागले. अशा तऱ्हेने शिक्षणाचा हा विकास व त्याबरोबरच संस्कृतीची समृध्दी १२ व्या शतकापर्यंत अखंड चालू होती. [४]

## १.४ स्वातंत्र्यपूर्व काळ :-

प्राचीन काळी शिक्षकला प्रशिक्षण देण्यासाठी मॉनिटोरिअल शिक्षण पध्दती वापरली जात असे. स्वत: शिकत असतानाच शिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली प्रगत [हुशार] विद्यार्थी आपल्या वर्गातील इतर

विद्यार्थ्यांचा अभ्यास होत असत. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांचे अध्यापनाचा अनुभव मिळत असे. तसेच त्या विद्यार्थ्यांचे स्वत:चे ज्ञान पक्के होत असे या पध्दतीमुळे प्रशिक्षण होण्यासाठी वेगळे प्रशिक्षण विद्यालय नसे. तसेच स्वत: शिकत शिकत आपल्या वर्गातील कमी बुध्दीच्या मुलांना शिकवत असत. त्यामुळे या पध्दतीवर खर्च होत नसे आणि त्यातून अध्यापनाचा अनुभव ही मिळत असे.

१९ व्या शतकात शैक्षणिक संस्थांतून पध्दतशीर शिक्षण देण्याची गरज भासू लागली इ.स. १८२६ मध्ये मद्रासचे गव्हर्नर थॉमस मन्रो यांनी लोकशिक्षण कमिटी नेमली या कमेटीने शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी एक मध्यवर्ती संस्था काढण्याची शिफारस केली. तसेच १८५४ च्या वुडच्या अहवालातील शिफारशी पैकी "अध्यापन विद्यालयांची स्थापना" ही एक शिफारस होती. इ.स. १८५९ मध्ये सरकारने अध्यापन विद्यालये स्थापण्यास मंजूरी मध्ये दिली. इ.स. १९२८ च्या हरटॉग समितीने प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणाविषयी महत्वाच्या सूचना केल्या. त्यामध्ये प्राथमिक शिक्षकांच्याचा शिक्षण विषयक दर्जा सुधारला पाहिजे, प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणाच्या कालावधी वाढविण्यास हवा, प्रत्येक प्रशिक्षण संस्थांमधून अधिक शिक्षकांना प्रशिक्षणासाठी प्रवेश द्यावा, उदबोधनवर्ग व सेवेत असलेल्या शिक्षकांसाठी मेळावे, परिषदा यांची योजना तयार करावी, प्राथमिक शिक्षकांच्या नौकरीतील अटी, पगार, सवलती या बाबतीत अशी सुधारणा घडवून आणावी की ज्यातून शिक्षणाचे स्थान व दर्जा उंचावेल. शिक्षक प्रशिक्षित असावेत असा आग्रह धरल्याने तसेच शिक्षणाचा विस्तार होत गेल्याने शिक्षक प्रशिक्षण देणाऱ्या संस्था वाढल्या. तथापि असे दिसून येते की, शिक्षक - प्रशिक्षणाच्या सोयी, स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीच्या १० वर्षांच्या काळात अपुऱ्या होत्या.

स्वातंत्र्यपूर्व काळात तीन प्रकारची प्रशिक्षण देणाऱ्या शाखा होत्या.

१) प्राथमिक शिक्षकांसाठी प्रशिक्षण संस्था
अशा प्रशिक्षण संस्थात व्हर्नाक्युलर फायनल पास झालेल्या लोकांना या विद्यालयापासून प्रवेश मिळत असे.

२) माध्यमिक प्रशिक्षण विद्यालये - यामध्ये कमीत कमी मॅट्रीकची परिक्षा पास असलेल्यांना या प्रकारच्या प्रशिक्षण विद्यालयात प्रवेश मिळत असे.

३) माध्यमिक प्रशिक्षण महाविद्यालये - या प्रशिक्षण संस्थांमधून जे उमेदवार पदवी परीक्षा पास असते, अशांना प्रशिक्षणासाठी प्रवेश मिळत असे. व पास झालेले उमेदवार माध्यमिक वर्गासाठी अध्यापन करण्यास लायक असत.

१.५ ** प्रशिक्षणाची आजवरची वाटचाल :-

इयत्ता १ ते ७ वी च्या प्राथमिक शाळेचा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना पूर्वी महाराष्ट्र राज्यात "प्रशिक्षणाचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम घेता येत होता. त्याकरिता प्रथम ३ व नंतर २ वर्षाचा प्रशिक्षण अभ्यासक्रम शिकविणारी ट्रेनिंग कॉलेज होती. पुरुष व महिलां करिता ती वेगवेगळी होती. कांही भागात यांनाच "नॉर्मल स्कूल" असे म्हणत त्यात प्रशिक्षित झालेल्या शिक्षकांना प्राथमिक शाळेत शिकविण्याची पात्रता प्राप्त होत होती. प्रारंभी कांही शालेय विषयांचा अभ्यास, शिक्षणशास्त्र पध्दती, प्रायोगिक पाठ इत्यादी या अभ्यासक्रमात

समावेश होता. कालांतराने समाजसेवा मूलोद्योगी शिक्षण, किंवा कार्यानुभव इत्यादी विषय आले. तसेच नंतर शालान्त परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांकरिता दोन वर्षांचा प्रशिक्षण क्रम चालू झाले. यशस्वी विद्यार्थ्यांना पदविका प्रमाणपत्र देण्यात येवू लागले. सध्या इ.स. १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा-मध्ये शिक्षक महत्त्वाचे स्थान दिले. त्यानुसार राष्ट्रीय शिक्षक प्रशिक्षण परिषदेने तयार केलेल्या अभ्यासक्रमामधील प्राथमिक स्तरावरील शिक्षक प्रशिक्षणाच्या कार्यक्रमात महत्त्वाचे बदल सुचविले त्यातआजवरची १० परीक्षा उत्तीर्ण ही अट काढून १२ वी परीक्षा उत्तीर्ण मुलांना डी.एड्. ला प्रवेश मिळेल असे सुचविले आहे.

१.६ शिक्षक शिक्षणाची आवश्यकता :-

शिकविणारा तो शिक्षक ही साधी व्याख्या :- शिकविण्याचे आता शास्त्र झाले आहे. पण ती एक कलाही आहे. शिक्षक जन्मावा लागतो तो घडविणे कठिण आहे. परंतु आजाच्या सामुदायिक शिक्षणाच्या युगात मात्र लाखानी शिक्षक तयार करावे लागतात. शिक्षकानी एकदा या व्यवसायात पडल्यानंतर, त्या पेशाची नीती पत्करली पाहिजे. समाजाच्या शिक्षकांबद्दल फार अपेक्षा असतात. शिक्षकाला आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडण्यासाठी प्रशिक्ष-णाची आवश्यकता आहे. शिक्षकांचा पेशा स्वीकारणाऱ्या प्रत्येक व्यक्तिने शिक्षक प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. प्रशिक्षण हे पूर्वीपासून चालत आलेले आहे. त्यामध्ये वरचेवर जस जसा समाजात बदल, सुधारणा होत गेल्या तसतशा प्रशिक्षणामध्येही नवनवीन सुधारणा

होत गेल्या. शिक्षण हा देश, समाज यांच्या जीवनाचा गाभा असल्यामुळे प्रशिक्षण घेणाऱ्या शिक्षकाला चांगले प्रशिक्षण मिळणे अतिगरजेचे आहे. कारण देशाच्या प्रगतीची उंची शिक्षणाच्या माध्यमा द्वारे मोजली जाते. प्रत्येक देशाच्या संस्कृतीची जपणूक ही शिक्षणातून होत असते.

**आजचा शिक्षक आणि शिक्षण प्रक्रिया :-**

शिक्षण प्रक्रिया आणि शिक्षक यांचा संबंध अनन्यसाधारण आहे. बदलत्या काळानुसार वेगवेगळ्या क्षेत्रात प्रगती होत गेली, व्याप वाढला, लोकसंख्येचा विस्फोट झाला, त्याच प्रमाणात शिक्षण क्षेत्रातपण मोठे बदल झालेले आहेत. शिक्षण प्रक्रिया आणि शिक्षकांची भूमिकाही बदलती राहिलेली आहे. आपल्या देशात आजतागायत शिक्षणाच्या संदर्भात शिक्षकाचे ध्येय, शिक्षक, विद्यार्थी, पालक, समाज, शासन यांच्या संदर्भात फार मोठ्या प्रमाणात विचार मंथन झालेले आहे व शिक्षणाचे ध्येय साध्य करण्यासाठी शिक्षकाची भूमिका महत्त्वाची ठरलेली आहे. म्हणून शिक्षक प्रशिक्षण हे बदलत्या काळानुसार बदलले पाहिजे.

१९८६ साली भारताचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर झाले. राष्ट्रीय शिक्षण प्रशिक्षण परिषद नवी दिल्ली या संस्थेने शिक्षक प्रशिक्षणाचा राष्ट्रव्यापी नवा आयाम व तदनुषंगाने भारतातील विविध विद्यापिठांनी आणि प्रशिक्षण अभ्यासक्रमात आमुलाग्र बदल करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. त्याच बरोबर पदविका अभ्यासक्रमात ही बदल अपेक्षित होते. भारताचा विविध क्षेत्रातील सर्वस्पर्शी विकास करण्याची जबाबदारी शिक्षणक्षेत्रावर येणे अपरिहार्य आहे. राष्ट्रीय विकासात

शैक्षणिक संस्था व प्रशिक्षण संस्था यांचे योगदान महत्वाचे आहे. कोठारी शिक्षण आयोगाने म्हटल्याप्रमाणे भारताचे भवितव्य वर्गखोलीतून साकार होत आहे हे तर सत्यच आहे पण त्याबरोबर काळाची पाउले ओळखून आजच्या अध्यापकाला प्रथम स्वत:मध्ये फार मोठी परिवर्तने करावी लागत आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा अध्यापन-कलेसाठी उपयोग करून घेवून एकविसाव्या शतकाची आव्हाने, बदललेली व बदलती सामाजिक परिस्थिती सुध्दा लक्षात घेवून शिक्षक प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम वेळोवेळी बदलून कार्यवाही होत आहे. देशाच्या ध्येय-धोरणानुसार आखलेला अभ्यासक्रम राबविणाऱ्या शिक्षकांच्याप्रशिक्षणावर अभ्यासक्रमाचे यश अवलंबून आहे. अभ्यासक्रमात समाविष्ट झालेल्या नव्या संकल्पनाचे संक्रमण अधिक चांगले होण्यासाठी शिक्षक प्रशिक्षणाची नवी तंत्रे सतत निर्माण होत असतात. उदा. सूक्ष्म अध्यापन, अध्यापन प्रतिमाने, नवी दृक-श्रवण साधने व आंतरक्रिया विश्लेषण तंत्र इत्यादी या तंत्राचे ज्ञान शिक्षकांना असणे आवश्यक आहे. म्हणूनच शिक्षक प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम गतिशील असला पाहिजे.

## १.७ ** शिक्षक प्रशिक्षणाची उद्दिष्टे :-

कोणत्याही देशाच्या प्रगतीचा मापदंड म्हणजे त्या देशातील शिक्षणाची गतिमानता शिक्षकांची गतिमानता शिक्षणाच्या गतिमानतेशी मिळती - जुळती असावयास हवी शिक्षक प्रशिक्षणाचे क्षेत्रात विविध प्रयोग करून शिक्षकांमध्ये प्रयोग शीलता निर्माण करता येते असा प्रगत देशांचा अनुभव आहे. शिक्षक प्रशिक्षणात गतीशीलता आणण्यासाठी अभ्यासक्रमाची पुनर्रचना सातत्याने होत राहणे

आवश्यक आहे. अभ्यासक्रमाची पुनर्रचना कालसापेक्ष आहे. - गुणवान प्रयोगशील, सृजनशील आणि कार्यक्षम शिक्षकच शिक्षणाची गुणवत्ता उंचावू शकतील. याच प्रमुख सूत्राचा विचार करता शिक्षक प्रशिक्षणाची सर्वसामान्य उद्दिष्टे खालील प्रमाणे ठरविली आहेत.

[१] पूर्व प्राथमिक, प्राथमिक, उच्च प्राथमिक स्तरावरील शिक्षणाच्या अभ्यासक्रमातील विविध पाठ्यक्रमाच्या रचनेची सर्वसामान्य तत्त्व व विशिष्ट उद्दिष्टे यांचे आकलन होण्यास मदत करणे.

[२] पूर्व प्राथमिक, प्राथमिक, उच्च प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रमात समाविष्ट केलेल्या सर्व विषयांच्या संदर्भात मूर्त प्रसंगाद्वारे व विविध साधनांच्याद्वारे अध्ययन अनुभव देण्यास समर्थ बनविणे

[३] बाल विकासाची तत्वे लक्षात घेऊन विविध विषयांच्या अध्यापनात समन्वय व एकात्मता साधून त्यानुसार अभ्यास विषय व अभ्यासानुषांगिक अध्ययन अनुभवांची नियोजन व कार्यवाही करण्याची क्षमता निर्माण करणे.

[४] विद्यार्थ्यांच्या विकास, त्याचे समायोजन आणि अध्ययना मध्ये येणाऱ्या उणिवा व अडचणी शोधून त्यावर उपाय योजण्यास समर्थ बनविणे.

[५] पटनोंदणी करणे, विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढवणे व टिकवणे आणि गळती व स्थगिती थांबविण्यासाठी प्रयत्न करण्यासाठी आवश्यक ती अभिवृत्ती आणि क्षमता निर्माण करणे.

[६] बहुवर्गाच्या शाळा, अधिक विद्यार्थी संख्या असलेले वर्ग, सामाजिक व शैक्षणिक विषमता असणाऱ्या विद्यार्थ्यांचे वर्ग, अपंग विद्यार्थी

समाविष्ट असलेले वर्ग योग्य प्रकारे हाताळण्याची क्षमता निर्माण करणे.

[७] विषयांच्या विविधतेनुसार आशयाची तर्कसंगत मांडणी व विषयानुरूप अध्यापन पद्धती यांचा वापर करून अध्यापन करण्याचे प्रभुत्व संपादन करण्यास साहाय्य करणे.

[८] विद्यार्थी केंद्रित, कृतिप्रदान व आंतरक्रियायुक्त अध्ययन अध्यापन करण्याची क्षमता निर्माण करणे.

[९] विविध विषयांच्या पाठ्यांशाचे व अध्यापनाचे विश्लेषण करण्याची क्षमता निर्माण करणे.

[१०] पूर्व प्राथमिक शिक्षण, अनौपचारिक शिक्षण, आदिवासी शिक्षण, मुलींचे शिक्षण, विशेष शिक्षण, लोकसंख्या शिक्षण, शैक्षणिक तंत्रज्ञान, नैतिक शिक्षण यामध्ये सहभागी होण्यासाठी अभिवृत्ती व कौशल्य निर्माण करणे.

[११] संशोधन वृत्ती व प्रयोगशीलता निर्माण करणे.

[१२] सातत्यपूर्ण व सर्वंकष मूल्यमापन करण्याची क्षमता निर्माण करणे.

[१४] लोकशाहीची, नैतिकतेची व सामाजिक मूल्ये जोपासण्याची क्षमता निर्माण करणे.

[१५] शालेय विकासात समाजाचा सहभाग होण्याचे कौशल्य निर्माण करणे.

[१६] ग्रामीण व नागरी वातावरणाच्या भिन्नतेनुसार बालविकासाचे अनेकविध उपक्रम आयोजित करण्याचे कौशल्य संपादन करून घेण्यास मदत करणे.

[१७] पूर्व प्राथमिक, प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरावरील इयत्तांसाठी उपयुक्त अशी शैक्षणिक साधने निर्माण करण्यास प्रवृत्त करणे.

इत्यादी शिक्षक प्रशिक्षणाची [पदविका] सर्वसामान्य उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून सध्याचा १२ वी उत्तीर्ण नंतर पदविका परिक्षेसाठी प्रवेश घेण्याच्या विद्यार्थ्यासाठी अभ्यासक्रमाची रचना केलेली आहे. प्राथमिक स्तरावर कार्य करणाऱ्या शिक्षकांच्या परिक्षणाचा जो सुधारित अभ्यासक्रम पुणे येथील महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने तयार केला आहे. त्याची वैशिष्टये खालील प्रमाणे :-

[०१] या अभ्यासक्रमाच्या पुनर्रचित शालेय अभ्यासक्रमाच्या पुनर्रचणेचा मागोवा घेण्यात आला आहे.

[०२] पुनर्रचित अभ्यासक्रमासाठी प्रवेश पात्रता इयत्ता १२ वी उत्तीर्ण अशी ठरविण्यात आली आहे.

]०३] पुनर्रचित अभ्यासक्रमासाठी प्रवेश पात्रता इयत्ता १२ वी प्रशिक्षण परिषदेने सेवापूर्व शिक्षक प्रशिक्षणासाठी तयार केलेल्या अभ्यासक्रमाचा विचार करून अभ्यासक्रमाची पुनर्मांडणी केलेली आहे.

[०४] दोन्ही वर्षासाठी [प्रथमवर्ष आणि द्वितीय वर्ष] तात्त्विक भाग व प्रात्यक्षिक भाग यांना अनुक्रमे ५५% व ४५% महत्वांश देण्यात आले आहेत.

[०५] पहिल्या वर्षासाठी सेवाशिबीर व दुसऱ्या वर्षासाठी दत्त्रासेवाकाल याची तरतूद या अभ्यासक्रमात करण्यात आली आहे.

[६] शिक्षकांना कोणत्या विषयासाठी किती तासिका उपलब्ध आहेत याची माहिती देखील योग्य ठिकाणी देण्यात आली आहे.

[७] या अभ्यासक्रमात अध्यापनाची प्रतिमाने व संगणक यासारख्या काही नव्या संकल्पनांना स्थान दिले आहे.

[८] अध्यापन पध्दतीचा विचार करताना विषयज्ञान व अध्यापन पध्दती या तत्वांचा स्वीकार केला आहे.

[९] प्रत्येक विषयाच्या अध्यापनाची उद्दिष्टे दिली आहे. त्यामुळे विषयाच्या अभ्यासक्रमात अपेक्षित वर्तन बदलाची कल्पना येऊ शकेल. [५]

१.८ ** <u>शिक्षक - प्रशिक्षणाची परिस्थिती</u> :-

१९ व्या शतकाच्या सुरुवातीला शिक्षक प्रशिक्षणात अखंडितपणा व क्रमबध्दता आली. प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षित करण्यासाठी सेरामपूर [बंगाल] मध्ये डॉ. कोरे यांनी "नॉर्मल स्कूल" [प्रशिक्षण विद्यालय सुरु केले] पुढे आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर समाजसेवी संस्थांना खाजगी शाळा सुरु करण्यास सरकारने प्रोत्साहन दिले.

प्रथमत: कांही सेवाभावी व्यक्तिंनी संस्था सुरु केल्या त्या संस्थांवर शिक्षणाचा जस जसा प्रसार होवू लागला तस-तसे शिकविण्यासाठी प्रशिक्षित शिक्षकांच्या अडचणी येवू लागल्या, यावर मात करण्यासाठी कांही संस्थाचालकांनी आपल्या भागातील शाळांना प्रशिक्षित शिक्षक मिळावेत या उदात्त हेतूनी प्रशिक्षण विद्यालये

सुरु केली. परंतु पुढे चालून शिक्षण संस्था काढणे आणि त्यातल्या- त्यात कोणत्याही शिक्षणाची प्रशिक्षण संस्था चालू करणे हा एक व्यवसायच होऊन बसला आहे. शिवाय प्रशिक्षण विद्यालय, महाविद्यालयास प्रशिक्षित शिक्षक, प्राध्यापक, मिळावेत या हेतूने संस्था सुरु केल्या जातात परंतु बहुतेक ठिकाणी या संस्थांना स्वतःच्या मालकीची इमारत नसेत, प्रशिक्षित प्राध्यापक मिळत नाहीत. प्राध्यापक मिळाले तरी सेवासातत्य देत नाहीत. [२]

थोडक्यात काही समाजसुधारकांनी शिक्षणा शिवाय समाज शहाणा होत नाही हे ओळखून नवीन शाळा चालू केल्या. त्या शाळांना प्रशिक्षित शिक्षक मिळावेत म्हणून प्रशिक्षण विद्यालये, प्रशिक्षण महाविद्यालये काढली परंतु आजच्या काळात या प्रशिक्षण विद्यालये आणि प्रशिक्षण महाविद्यालये यांचे फार झपाट्याने बाजारीकरण होत आहे. आणि त्यामुळे येथे तयार होणाऱ्या शिक्षकांचा शैक्षणिक दर्जा ढासळत आहे. जो पर्यंत प्रशिक्षण महाविद्यालयांचे आणि विद्यालयांचे बाजारीकरण थांबणार नाही तोपर्यंत शैक्षणिक दर्जात सुधारणा होणे शक्य नाही.